# प्रस्तावना

# (PREFACE)


| क्रं. | अनुक्रमणिका | पान. क्रं. |
|---|---|---|
| १ | समस्या सुत्रण(Statemant of the Problem) | ३ |
| २ | उद्दिष्टे (Objectives of The Study) | ४ |
| ३ | गृहीत प्रमेय (Hypotheses) | ४ |
| ४ | संशोधन पद्धती (Methodology) | ५ |
| ५ | विषयातील प्रकरणे (The Chapters) | ६ |
| ६ | साहित्याचे पुनरावलोकन (Literature Review) | ७ |

# प्रस्तावना(PREFACE)

१२ ऑक्टोबर १९९९ रोजी जनरल मुशर्रफ यांनी रक्तहीन सत्ताबदल केला. या सत्ताबदलास जागतिकबँकने“साइलेंट रिवोल्यूशन” अशी संज्ञा दिली. लोकशाही सरकार असलेल्या नवाझ शरीफ यांच्या सरकारला हटवून पाकिस्तानच्या कार्यकारी प्रमुखपदी(Chief Executive)मुशर्रफ यांनी स्वत:ची नियुक्ती केली. पाकिस्तानमध्ये सैन्य हस्तक्षेप हा पहिल्यांदा नव्हता.आर्थिक विकास ठप्पझाला होता. सेंट्रल बँक रिकामी झाली होती, यामुळे पाकिस्तानपुढे आर्थिक सुरक्षिततेचेप्रश्न निर्माण झाले होते. कारगिल संघर्षात पाकिस्तान भारताकडून पराभूत झाल्यामुळे राष्ट्राअंतर्गत राजकीय अस्थिरता निर्माण झाली होतीतसेच अलगाववादी, सिया—सुनी संघर्षात वाढ आणि इस्लामिक दहशतवादी संघटनांद्वारे दहशतवादामध्ये झालेली वाढ यामुळे कायदा आणि सुव्यवस्था नव्हती. पाकिस्तानच्या सुरक्षा धोरणातील बदल होण्यामध्ये नोव्हेंबर १९८८ ते ऑक्टोबर १९९९ या अकरा वर्षाची पार्श्वभूमी महत्त्वपूर्ण आहे. या काळामध्ये चार पंतप्रधान व तीन राष्ट्रपती झाले तर चार सार्वजनिक निवडणुका घेण्यात आल्याने राष्ट्रीय संपत्तचे नुकसान झाले होते आणि अमेरिकेवर ११ सप्टेंबर २००१ मध्ये दहशतवादी हल्ला झाल्यानंतर, अमेरिकाप्रणित दहशतवादाविरूध्द लढण्यासाठी पाकिस्तान तयार झाले. तर मुशर्रफ यांच्या कालखंडात दहशत आणि दहशतवादी संघटनांमुळे पाकिस्तानच्या सुरक्षेस मोठा धोका निर्माण झाला. या दहशतवादामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि विकासाच्या चौकटीत पाकिस्तान कमकुवत झाला होता. दुसरीकडे पाकिस्तानचे सुरक्षा धोरण भारत केंद्रीत असल्याने, भारतासोबत असलेल्या पाकिस्तानचे संबंध येथे महत्त्वाचे वाटतात. जनरल परवेझमुशर्रफ यांच्या काळाची सुरुवात ही भारतासोबत निर्माण झालेल्या कमी तीव्रतेच्या संघर्षा (कारगील) पासूनझाली. २००४ च्या शेवट पर्यंत भारतासंदर्भात जनरल परवेझमुशर्रफ यांच्या धोरणात काही बदल झाला नाही, मात्र२००५ मध्ये पाकिस्तानने जिहादचा राग बंद केला

आणि भारताच्या अधिपत्याखाली असलेल्या काश्मीर भागात घुसखोरी थांबवली तसेच या वेळीमुशर्रफ यांनी स्वीकार केला की काश्मीर प्रश्न हा “संयुक्त संवादा” द्वारे सोडविता येतो’.सुरक्षा आणि विकासाच्या दृष्टीने अमेरिका आणि चीन महत्त्वाचे असलेल्याने व त्यांच्या सहकार्याने पाकिस्तान आपला लष्करी आणि आण्विक विकास करताना दिसून येतो याचे मुख्य कारण म्हणजे आज दक्षिण आशियातील भारताच्या वर्चस्वामुळे पाकिस्तानच्या सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याची भावना आहे.

##  **समस्या सुत्रण**(Statemant of the Problem)

इ.स. १९९० च्या दशकात पाकिस्तानच्या सुरक्षा विषयक दृष्टिकोनात काही महत्त्वाचे बदल घडून आले. त्यातील काही बदल हे भारताच्या संदर्भात होते. तर काही जागतिक पातळीवरील दहशतवादाच्या संदर्भात होते.

जनरल मुशर्रफ यांनी १९९९ मध्ये सत्ता हाती घेतली त्यावेळची परिस्थिती बिकट होती. नवाज शरीफ यांच्या कालखंडात मुशर्रफ यांचामुळे कारगिलचे युध्दझाले. तसेच पाकिस्तानमध्ये इस्लामिक दहशतवादाच्या समस्या जाणवू लागल्या होत्या.

जनरल मुशर्रफ यांच्या कालखंडात पाकिस्तान समोरील ज्या महत्त्वाच्या सुरक्षा विषयक समस्या होत्या, त्या पुढीलप्रमाणे

१ भारताबरोबरील संबंध, यामध्ये काश्मीर संदर्भातील समस्यांचा समावेश होतो. तसेच संबंध सामान्य करण्यासाठी केलेले प्रयत्न बघणे आवश्यक होते.

२ पाकिस्तानमध्ये जाणवत असलेला दहशतवाद आणि त्याचे अफगाणिस्तान संदर्भातले संबंध.

३ पाकिस्तानचे अमेरिकेशी तसेच चीनशी असलेले संबंध.

## □ उद्दिष्टे(Objectives of The Study)

“पाकिस्तानचे सुरक्षा धोरण” जनरल मुशर्रफ कालखंड संशोधन विषय निवडण्याचा उद्देश म्हणजे ऑक्टोबर १९९९ ते ऑगस्ट २००८ या काळादरम्यानची परिस्थिती पाहता पाकिस्तानच्या सुरक्षाविषयक धोरणात अनेक बदल निर्माण झाले आहेत. याची कारणमिमांसा करणे हा मुख्य उद्देश आहे. तसेच भारत, चीन आणि अमेरिका यांच्या सोबत पाकिस्तानचे असलेले संबंध ज्यामुळे पाकिस्तानसातत्याने सुरक्षा धोरणातकाळानुरूप अनेक बदल करताना दिसतो याचेमहत्त्व काय? याचा येथे अभ्यास केला आहे.

## □ गृहीतप्रमेय(Hypotheses)

१. दहशतवादाचा धोका हा जागतिक स्वरूपाचा आहे. हा धोका पाकिस्तानच्या राज्य व्यवस्थेला देखील जाणवतो.

२. जनरल मुशर्रफ यांच्या कालखंडामध्ये इस्लामिक दहशतवादाचे धोके पाकिस्तानला जाणवू लागले. हे धोके सुरुवातीला पंजाबप्रांत नंतर सिंध व बलुचिस्तानमध्ये पसरले.

३. मुशर्रफ यांनी दहशतवादाससामोरे जाण्यासाठी तीन प्रमुख उपाय योजना आखल्या

अ. दहशतवादाविरोधी लष्करी बळाचा वापर ( ऑक्टोवर २००६, बजैरवर हल्ला)

ब. भारताशी संवांद साधण्याचा प्रयत्न.

क. अफगाणिस्तान संदर्भात अमेरिकेच्या सहकार्याने धोरण आखण्याचा प्रयत्न.

४. चीनच्या सहकार्याने आण्विक आणि भू—सामरिक परिक्षेत्राचा (कॉरिडोरचा)विकास करतभारताच्या विरुध्द विश्वासार्ह किमान प्ररोधनचा वापर करणे

##  संशोधन पद्धती (Methodology)

जनरल परवेझ मुशर्रफ यांच्या कालखंडातील पाकिस्तानचेसुरक्षा धोरण या विषयाच्या विश्लेषणामध्ये विश्लेषण पद्धतीचा वापर केलेला आहे. हा अभ्यास मुख्यत: प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांवरसुद्धा अवलंबून आहे. या संशोधनाकरितानिवडलेली संशोधन पद्धत, ही ऐतिहासिक विश्लेषणात्मक पद्धत आहे.

संशोधनासाठी प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. प्राथमिक स्त्रोतामध्ये सरकारी दस्तऐवज आणि मुलाखतीघेण्यात आल्या आहेत. सरकारने प्रकाशित केलेल्या वार्षिक अहवालांचा आणि पाकिस्तान दूतावासातीलतज्ज्ञांची मुलाखतआणि दूतावासाच्यासंकेतस्थळाचा वापर करण्यात आला आहे. पाकिस्तान आणि चीन संबंध संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताच्या विश्लेषणाचा वापर हा मोठया प्रमाणात करण्यात आला आहे. ज्यात पुस्तके,मासिके, नियतकालिके,प्रसारमाध्यमे आणि इतर काही प्रकाशित कागदपत्रांचा आधार घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, आधुनिक साधनांमध्ये तथ्य संकलनासाठी इंटरनेटचासुद्धा वापर करण्यात आलेला आहे.

विषयाच्या अधिकाधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करण्यासाठी नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरूविद्यापीठाच्या ग्रंथालयाचावापर करण्यात आला आहे. तसेच संरक्षण आणि संशोधन शास्त्र संस्था (IDSA),तिनमुर्ती भवन स्थित नेहरू सेंटर ग्रंथालयआणि मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयाचावापर करण्यात आला आहे. तसेच नवी दिल्ली आणि मुंबई येथील विषयाशी संबंधीत तज्ज्ञांशी या विषयासंबंधी चर्चा करून माहिती गोळा करण्यातआली आहे.

##  **विषयातील प्रकरणे** (The Chapters)

**प्रकरण पहिले** :पहिल्याप्रकरणातसुरक्षाविषयक संकल्पना दिली आहे आणि पाकिस्तानच्यासुरक्षा धोरणात होणारा बदल आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या राजकीय आणि भौगोलिक बदलांचासुरक्षा धोरणावर होणारा परिणाम यांची माहिती दिली आहे. तसेच, पाकिस्तानमधील राजकीय घडामोडीमध्ये धार्मिक घटकांचावाढता प्रभाव, इ.स.१९९८ आण्विक चाचणी आणि इ.स. १९९९ मधील कारगील संघर्षामुळे पाकिस्तानवर झालेल्या दूरगामी परिणामांचीहीमाहिती दिली आहे. त्यामुळे जनरल परवेझ मुशर्रफ यांनी सैनिकी हस्तक्षेप करून राष्ट्रात सत्तापालट केला व ते चौथेसैन्यशासक म्हणून सत्तेवर आल्याचे दिसून येते.

**प्रकरण दुसरे** :दहशतवादाची निर्मिती पाकिस्तानच्या निर्मितीनंतर उदयास आलेल्या मुलतत्त्ववादी धार्मिक संघटनांच्या प्रसारामुळे, सामाजिकरुढी आणि बदलत्या राजकीय घटना यांचा समाजावर दुष्परिणाम होत आहे.पाकिस्तानच्या सुरक्षाविषयक समस्यांमध्ये प्रांतातील दहशतवादामुळे तेथे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा प्रश्न निर्माण झाले.परिणामी पाकिस्तान हे अस्थिर राष्ट्र असल्याचे दिसून येत असल्याची जाणीव निर्माण झाल्यामुळे पाकिस्तान सरकारने दहशतवादाविरुध्द सैन्य मोहिमेस सुरुवात केली.

**प्रकरण तिसरे** :पाकिस्तान आणि भारत संबंधातील अभ्यास या प्रकरणात आहे. दोन्ही देशांतीलसंबंधात सुरवातीपासून म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इ.स. १९४७—४८ च्या काश्मीर मुद्‌यावरून संघर्षसूरू झाला. द्विराष्ट्रांमध्ये नंतर १९६५ व १९७१ मध्येपूर्ण युध्द झाले. दहशतवाद आणि सीमा विवाद असल्याने पाकिस्तानचे सुरक्षा धोरण भारत केंद्रीत राहीले त्यामुळेआण्विक शस्त्र स्पर्धानिर्माणझाली यास्पर्धेमुळेआंतरराष्ट्रीय स्तरावर त्याचा प्रभाव जाणवतो.

**प्रकरण चौथे :**या प्रकरणामध्येपाकिस्तानचे अमेरिका आणि चीन यांच्याशी असलेल्या संबंधातील अभ्यास आहे.पाकिस्तानचे अमेरिकेसोबत असलेल्या संबंधात स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजतागायतसुरक्षा आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. पाकिस्तान आणि चीन यांच्या संबंधाला आण्विक आणि भूसामरिक परिक्षेत्रया घटकांमुळे आज आंतरराष्ट्रीय स्तरावर अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याचा विचार येथेकेला असून पाकिस्तानचाया दोन्ही देशाकडे पाहण्याचा दृष्टिकोनकाययाचा ही अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरणपाचवे:**शेवटच्या प्रकरणामध्ये निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे. “पाकिस्तानचे सुरक्षा धोरण”हे जनरल परवेझ मुशर्रफ यांच्या कालखंडातील स्वरूप आणि अभिप्राय पाहून मूल्यांकन करण्याचा प्रयत्न केला आहे.

## □ साहित्याचे पुनरावलोकन (Literature Review)

या विषयावर मोठ्या प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. यात सरकारी दस्तऐवज, पुस्तके आणि नियतकालिकांचासमावेश आहे. सर्व पुस्तकांमधून मला मूलभूत माहिती आणि नियतकालिकांमधून नवीन घडामोडींची माहिती मिळाली. त्याव्यतिरिक्त मी इंटरनेट आणि वृत्तपत्रांमधून बरीच माहिती संकलित केली आहे.

Parvez Musharraf, In *the Line of Fire: A Memoir*[1] हेजनरल परवेझ मुशर्रफ यांचे आत्मचरित्र आहे. पाकिस्तानपुढे आर्थिक सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण झाल्यानेमुशर्रफ यांनी सैन्यसत्ता लागू केली. अमेरिकेने पुकारलेल्या दहशतवादविरोधी युद्धामध्ये दाखल झाल्याची कारणे आणि पाकिस्तानमधील

[1]Parvez Musharraf, *In The Line of Fire: A Memoir* (London: Simon & Schuster, 2006).

सैन्याचे, राजकीय नेते व न्यायाधिशांचे असलेले महत्त्व या संबंधी स्पष्टपणे उल्लेख केल्याचे दिसून येते.

Musa Khan Jalalzai, *The Foreign Police of Pakistan: Afghanistan, Kashmir and Internal Security Threats*[2]जालालझाइ यांनी जनरल परवेझ मुशर्रफ यांच्या कालखंडातील इ.स.१९९९ ते इ.स. २००४ मध्ये काश्मीर संबंधी झालेला बदल आणि भारतासोबत चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न याविषयी एका भागात विस्ताराने विश्लेषण केल्याचे दिसून येते.

Stephen P.Cohen, *The future of Pakistan*[3]कोहेन यांनी पाकिस्तानसंबंधी चांगलेलेखन केले आहे. पाकिस्तानचेशैक्षणिक,आर्थिकआणि आंतरराष्ट्रीय सामरिक महत्त्व यांचा विकास केल्यानंतर भविष्यात त्याचे काय महत्त्व असेल हे मांडले आहे.

Ravi Kalia edited book on *Pakistan: From the Rhetoric of Democracy to the Rise of Militancy*[4]यापुस्तकात जीनांपासून ते आज निर्माण झालेल्या सरकार बाबतलेख लिहिला आहे.तसेच लेखकाने संपादित केलेल्या या पुस्तकामध्ये लोकशाहीशी संबंधित अनेक घटक आणि इतर विषयांना न्याय दिला आहे.

Cary Schofield, *Inside the Pakistan Army : A Womans Experience on the frontline of the war on terror*[5]कॅरी यांनी आपल्या या पुस्तकामध्ये

---

[2]Musa Khan Jalalzai, *The Foreign Police of Pakistan: Afghanistan, Kashmir and Internal Security Threats* (Lahore: Ariana Publication , 2004).

[3]Stephen P. Cohen, *The future of Pakistan* (Washington DC: The Broking Institution, 2011)

[4] Ravi Kalia (Ed) *Pakistan: From the Rhetoric of Democracy to the Rise of Militancy* (New Delhi: Routledge, 2011).

[5] Cary Schofield , *Inside the Pakistan Army : A Woman's Experience on the frontline of the war on terror* (New Delhi: Pentagon Press, 2011)

पाकिस्तानमधील सैन्याचे महत्त्व, सैन्याचा सत्तेमध्ये टप्प्याटप्प्यानेवाढणारा सहभाग आणि सेनाधिका—यांच्या हाती एकवटणारी सत्ता या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच राष्ट्रांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आय.एस. आय. चे महत्त्व, जनरल मुशर्रफ यांच्या कार्यकाळात अमेरिकेने पुकारलेल्या दहशतवादविरोधी युद्धामध्ये सैन्याचे महत्त्वाचे योगदान, यासंबंधी स्पष्टपणे मांडणी केली आहे.

Lawaarence Ziring, *Pakistan : At the cross current of History*[6]या झिरिंग यांनी पाकिस्तानच्या इतिहासापासून ते 'आजच्या घडीच्या पाकिस्तानमधील राजकीय बदल' या विषयाची चांगल्या प्रकारे मांडणी केली आहे. स्वातंत्र्य आणि सैन्यसत्तायांमुळे या राष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय घटकांवर सैन्याचे वर्चस्व निर्माण झाल्याचे दिसून येते. तसेच, राष्ट्राच्या धोरणावरील मूलतत्त्ववादी आणि इस्लामचा प्रभाव, दहशतवादामुळेघडलेले राजकीय परिवर्तन हे मुद्दे झिरिंग यांनी विस्ताराने मांडले आहेत.

Swaran Singh, *China-South Asia: Issue, Equations Policies*[7]स्वरण सिंग यांनी आपल्या या पुस्तकामध्ये पाकिस्तान आणि चीन संबंध हे 'विशेष' असल्याचे म्हटले आहे. त्यांनी द्विराष्ट्रांचे सैन्य आणि आण्विक क्षेत्रात सहकार्य असण्याचे कारण म्हणजे भारत हा महत्त्वाचा घटक मानला आहे.

Another book edited by Swaran Singh,*China-Pakistan Strategic Cooperation Indian Perspectives*[8]स्वरणसिंग यांनी संपादन केलेल्या या पुस्तकामध्ये पाकिस्तान आणि चीन यांची धोरणे, संरक्षण आणि सामरिक सहकार्य यांची माहिती दिली आहे. त्यात तिन्हीसंरक्षक दले व आण्विक

---

[6] Lawaarence Ziring, *Pakistan : At the cross current of History* (England: Oneworld Publication,2003)

[7] Swaran Singh, *China-South Asia: Issue, Equations Policies* (New Delhi: Lancers books, 2003).

[8] Swaran Singh, (ed)*China-Pakistan Strategic Cooperation Indian Perspective* (New Delhi: Manohar & Centre De Sciences Humaines, 2007)

क्षेपणास्त्रवाहू तंत्रज्ञानासंबंधी लेख आहेत. तसेच 'मौलिक आणि सामरिक सहकार्यासंबंधीचेकरार' या विषयाचा विस्तृत विचार केला आहे.

P.L.Bhola,*Pakistan-China Relations Search for politico-strategic Relationship*[9]लेखकाने पाकिस्तान आणि चीन यांच्या बदलत्या संबंधाची माहिती या पुस्तकात दिली आहे. याचा अर्थइ.स.१९५८ व १९६२ आणि १९६३ ते १९६५ मध्ये या दोन्ही राष्ट्रांत जवळीक कशी झाली?इ.स.१९६६ ते १९६९ मध्ये पाकिस्तान आणि चीन यांच्या संबंधात समतोलकसासाधला गेला?जनरल अयूब खान यांच्यानंतरचा काळ ते इ.स.१९७१ पर्यंतचे संबंध कसे होते तसेच द्विराष्ट्रांतील आर्थिक आणि सांस्कृतिक संबंधाची मांडणी केली आहे.

Ashok Kapoor, *Pakistan in Crisis*[10]या पुस्तकात १९४७ ते १९५८ पर्यंतची पाकिस्तानची राजकीय रचना, नंतर जनरल अयूब खान यांचा मार्शल लॉ, जनरल याह्या खान यांची सत्ता, १९७१ नंतर पाकिस्तानमध्ये लोकशाही सरकार झुल्फिकारअली भुट्टो यांचे विचार आणि १९७८ नंतर जनरल झिया यांचे हुकूमशाही पद्धतीचे विचार इ. मुद्दे मांडले आहेत.

M.Rasgotra(ed.), *Glimpses of Pakistan*[11]या पुस्तकातगरिमा सिंघ यांनी पाकिस्तानच्या आण्विक कार्यक्रम आणि शस्त्र कार्यक्रमाची स्पष्ट व विश्लेषणात्मक मांडणी केली आहे. या पुस्तकामध्ये आण्विक खर्चाचा लेखाजोखा सविस्तर मांडण्यात आला आहे.

---

[9] P. L. Bhola, *Pakistan-China Relations Search for politico-strategic Relationship* (Jaipur: R.B.S.S. Publication,1986)

[10]Ashok Kapoor, *Pakistan in Crisis* (London: Routledge, 2006)

[11]M. Rasgotra(ed.), *Glimpses of Pakistan* (New Delhi: Samskriti & ORF, 2005)

Samina Shabir & Reema Kazmi, 'Economic Effects of the Recently Signed Pak-China free trade agreement'[12]या लेखामध्ये पाकिस्तान आणि चीन यांच्यातील व्यापारिक संबंधाचा इतिहास,द्विराष्ट्रांमधीलमुक्त व्यापार करारआणिपाकिस्तानचा मुक्त व्यापार करार हा इतर देशांशी असलेला लेखाजोखातसेच सर्व व्यापारिक घटकांचा विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे.

Atul Kumar, 'China-Pakistan Economic Relation'[13]या लेखात अतुल कुमार यांनी पाकिस्तान आणि चीन यांच्यातील आर्थिक संबंधाच्या आकडेवारीचा लेखाजोखा मांडला आहे. तसेच, द्विराष्ट्रांमधील संयुक्त प्रकल्प; सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र या संबंधी माहिती, आणि चीनने पाकिस्तानमध्ये केलेली गुंतवणूक या संबंधी माहितीची विश्लेषणात्मक मांडणी केली आहे.

Zahid Anwar, 'Development of Infrastructural Likages between Pakistan and Central Asia'[14]या मध्ये पाकिस्तानमधील ग्वादर बंदरचे महत्त्वपूर्ण स्थान आणि त्यांच्या विकासामुळे केंद्रीय आशिया खंडातील राष्ट्राचे तेल आणि गॅस यांची जुळवणी; यामुळे पाकिस्तानच्या विकासास कशा प्रकारे चालना मिळालीया विषयाची विश्लेषणात्मक मांडणी केली आहे.

---

[12]Samina Shabir & Reema Kazmi, "Economic Effects of the Recently Signed Pak-China free trade agreement", *The Lahoro Journal of Economics* special edition- Septmber 2007.

[13]Atul Kumar, "China-Pakistan Economic Relation" *IPCS special Report* 30- September 2006.

[14]Zahid Anwar, "Development of Infrostructural Likages between Pakistan and central Asia," *South Asian Studies*, VO.26, NoI. January-June 2011.

1999-2008 By Amicus. Between November 1988 and February 1997, the troika comprising the President, the Prime Minister and the Chief of Army Staff ruled the country, reflecting the reality of a power-equation that in practice was not very stable. Despite the systems parliamentary faade, it was understood that the armed forces would have a decisive say in the matters of defense and foreign policy, including Pakistans, then, clandestine nuclear program and its agenda in Afghanistan and Kashmir.Â  In the early hours of 13 October 1999, General Musharraf addressed the nation and referred to the turmoil and uncertainty through which the country had lately passed. A conviction for high-profile treason carries the death penalty or life imprisonment. Pervez Musharraf, who ruled Pakistan from 1999 to 2008, has been declared a fugitive in the Benazir Bhutto murder case and Red Mosque cleric killing the case. Share. More >. Vote. Click/tap here to subscribe to Khaleej Times news alerts on WhatsApp. Make sure you save the phone number under Contacts on your phone for uninterrupted service. ERROR: Macro /ads/dfp-ad-article-new is missing!